

**नांदेड : वसरणी येथील खुनाच्या घटनेतील तीन संशयितांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अटक केली आहे.** [illegible] 23/03/2022

# वसरणी खुनातील तीन संशयितांना अटक

**नांदेड, ता.२२ (बातमीदार)** : नांदेड ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत वसरणी येथे सोमवारी (ता.२२) एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. तेथे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, सहायक पोलिस निरीक्षक पी. डी. भारती यांनी सहकाऱ्यांसह भेट देऊन पाहणी केली.

सदर मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी त्याचे फोटो काढून व्हॉटसअॅपवर व्हायरल केले होते. सदर मयताचे नाव गजेंद्र उर्फ बिल्टा कैलास ठाकूर (वय १७, रा. सांगवी नांदेड) असे असल्याचे समजले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला योगेंद्र ठाकूर, सुरेंद्र ठाकूर, निलेश बेनुरकर, जारुदत्त, बालाजी वाघमारे यांनी सदर व्यक्तीचा खून केला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून पथकाने योगेंद्र ठाकूर, सुरेंद्र ठाकूर आणि निलेश पेनुरकर या तीन संशयीतांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी खून केल्याचे स्पष्ट केले. नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला असून, दोन फरार आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत.

# महिलेची आत्महत्या: आरोपीस पाच वर्ष सक्तमजुरी

सत्यप्रभा 23/03/2022



**नांदेड दि.२२( प्रतिनिधी)**– विनयभंग केल्याने एका महिलेने आत्महत्या केल्या प्रकरणातील आरोपीस पाच वर्ष सक्तमजुरी आणि ३ हजार रुपये रोख दंड अशी शिक्षा मुखेडचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन.पी.त्रिभुवन यांनी ठोठावली आहे.

मुक्रामाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात राहणाऱ्या महिलेचा आरोपी शंकर लक्ष्मण नरेवाड याने विनयभंग केला होता. यातून सदर महिलेने स्वतःवर रॉकेल टाकून पेटवून घेतले.उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते उपचार सुरु असताना सदर महिलेचा मृत्यू झाला .

महिलेने दिलेल्या मृत्यूपूर्व जबाबानुसार

दाखल करण्यात आला होता .तपासाअंती तत्कालीन पोलीस उपनिरिक्षक बी.डी. तुंकलवाड यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. हा खटला मुखेडचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन.पी. त्रिभुवन यांच्या न्यायालयात चालला १० साक्षीदारांची साक्ष व उपलब्ध पुरावा आधारे आरोपी शंकर लक्ष्मण नरेवाड यास दोषी ठरवत पाच वर्ष सक्तमजुरी आणि ३ हजार रुपये रोख दंड अशी शिक्षा मुखेडचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन.पी.त्रिभुवन यांनी ठोठावली आहे.

या खटल्यात सरकार पक्षाची बाजू सहाय्यक